## APPENDIX- M

### विदयार्थी शिक्षकांच्या शैक्षणिक तंत्रज्ञान विषयक अभिवृत्ती मापिका

आपण आज विदयार्थी शिक्षक आहात त्याच बरोबर उद्याचे भावी शिक्षक आहात बी. एडच्या अभ्यासक्रमात शैक्षणिक तंत्रज्ञान हा एक ऐच्छिक विषय आहे. हा विषय निवडतांना विदयार्थी शिक्षकाची अभिवृत्ती कशी आहे, याचे मापन करण्यासाठी सदरची प्रश्नावली तयार केलेली आहे. ही प्रश्नावली म्हणजे कोणत्याही प्रकारची परीक्षा नाही. प्रश्नावलीमधील सर्व विधाने काळजीपूर्वक वाचून आपले खरे मत उत्तरपत्रिकेत व्यक्त करा.

सूचना

१. प्रश्नावलीमध्ये कोणत्याही प्रकारची खूण अथवा मजकूर लिहू नका.

२. उत्तरपत्रिकेत प्रत्येक विधानापुढे उत्तरासाठी १ ते ५ क्रमांक दिले आहेत. आपणास योग्य वाटणाऱ्या रकान्यात बरोबर ( ) खूण करून आपण आपले त्या विधानासाठी असणारे मत व्यक्त करा.

   १. पूर्णपणे सहमत

   २. सहमत

   ३. सांगता येत नाही

   ४. असहमत

   ५. पूर्णपणे असहमत

३. प्रत्येक विधानासंबधी आपले मत व्यक्त करणे आवश्यक आहे.

४. प्रत्येक विधानासाठी एकच बरोबरची ( ) खूण करा.

५. उत्तरपत्रिकेत व्यक्तीगत विचारलेली माहिती पूर्णपणे दया.

१) शैक्षणिक तंत्रज्ञान विषय नवीन आहे. म्हणून याची निवड केली.

२) व्यावसायिक क्षेत्रात या विषयाचे महत्त्व अधिक आहे.

३) शैक्षणिक तंत्रज्ञान विषयाची माहिती असल्याशिवाय चांगले शिकवता येणार नाही.

४) शैक्षणिक तंत्रज्ञान विषय बी. एड. अभ्यासक्रमात महत्वाचा वाटतो.

५) अद्ययावत माहिती मिळविण्यासाठी हा विषय उपयुक्त आहे.

६) सध्याच्या नवीन माहिती आणि तंत्रज्ञानाशी विषय संबंधीत आहे म्हणून याची निवड केली.

७) या विषयाच्या अभ्यासाने शिक्षण क्षेत्रातील समस्या सोडविण्यास मदत होते.

८) शिकविताना चांगल्या शैक्षणिक साहित्याचा वापर करण्यासाठी या विषयाची निवड केली.

९) वेगवेगळया माध्यमांचा वापर करुन शिकविणे योग्य ठरते.

१०) दूरदर्शन वरील शालेय कार्यक्रम पाहण्याची संधी विद्यार्थ्यांना दयावी.

११) दूरदर्शन वरील सर्वच कार्यक्रम संस्कारक्षम असतात.

१२) रडिओवरील शालेय कार्यक्रम दर्जेदार असल्यामुळे ते ऐकण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करावे.

१३) पाठयपुस्तकातील एखादा घटक विद्यार्थ्यांना कळत नसेल तर तो घटक पूर्णतः दुर्लक्षित करुन वगळून टाकावा.

१४) संगणकाचे ज्ञान असलेच पाहिजे असे नाही.

१५) नवनवीन संगणक कार्यक्रम स्वतः तयार करुन शिकवताना वापरले पाहिजेत.

१६) संगणकाचे संपूर्ण ज्ञान, माहिती असेल तरच विद्यार्थ्यांना संगणकाचे अद्ययावत ज्ञान, माहिती देता येईल.

१७) संगणक प्रशिक्षण सक्तीचे न करता ज्याला हवे असेल त्यालाच ते देण्यात यावे.

१८) अभ्यासक्रम लवकर संपाविण्यासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग घेवू नये.

१९) शिकविताना कोणत्याही साधनाचा वापर न करता शिकविणे योग्य असते.

२०) स्वतःहून अभ्यास करण्याची वृत्ती वाढीस लावण्यास शिक्षकाचा सहभाग असत नाही.

२१) आपल्या विषयातील घटकांचे लहान गट करुन न शिकविता ते तसेच शिकवावेत.

२२) विद्यार्थी अनुभवी नसल्याने त्यांना मार्गदर्शन करावे.

२३) विद्यार्थ्यांच्या फक्त बौध्दिक विकासाकडेच लक्ष दयावे.

२४) एखादा घटक शिकविताना विद्यार्थ्यांच्या वयाचा विचार न करता तो घटक शिकवावा.

२५) विद्यार्थी लहान असल्यामुळे त्यांना सर्वबाबी समजत नाहीत म्हणून शिकवताना फक्त शिक्षकालाच महत्व असले पाहिजे.

२६) वर्गात शिकविणे चांगले होण्यासाठी नियोजन करणे गरजेचे नसते.

२७) सध्या वर्गात विद्यार्थी संख्या जास्त असल्यामुळे मोठया प्रतिकृतीचा वापर करुनच शिकवावे.

२८) विज्ञान प्रदर्शनाचे शिक्षकाने स्वतःच आयोजन करावे.

२९) विद्यार्थ्यांना एखादया यंत्राची रचना, कार्यपध्दती समजणे गरजेचे नसल्याने त्यावर चर्चा न करता सर्वकाही सांगावे.

३०) गट चर्चेत फक्त गट प्रमुखच बोलतो, ते सर्व गटाचे मत असल्यामुळे विद्यार्थ्यांना गट चर्चेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्याची गरज नसते.

३१) शाळेत लागणारी उपकरणे व साधने आजू बाजूला उपलब्ध असलेल्या साहित्यातून बनवून वापरावीत.

३२) शाळेमध्ये कमी खर्चात उपकरणे तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

३३) विद्यार्थ्यांच्या झाडे परिचयाची असल्यामुळे विज्ञान विषय शिकवताना वनस्पती संग्रह करण्यास सांगून त्यांचा वेळ वाया घालवू नये.

३४) शाळेतील एखादे उपकरण नादुरुस्त झाले तर ते दुरुस्त करण्यात श्रम व वेळ न घालविता लगेच एखादया नामांकित कंपनीचे उपकरण आणावे.

३५) शाळेतील विविध उपकरणांची साधनांची देखभाल करण्यासाठी शिपाई वर्ग असला तरी त्याकडे लक्ष द्यावे.

३६) शाळेतील उपकरणे कोणत्या वर्गासाठी केव्हा उपलब्ध असेल याचा विचार न करता हवे तेव्हा वापरावे.

३७) शालेय साधनांचा वापर करण्यामुळे विद्यार्थ्यांना विषय चांगला समजण्यास मदत होते.

३८) पेपर तपासणी संगणकाद्धारे करुन प्रत्येक विद्यर्थ्यास त्याच्या पेपरमधील उणीवा दाखवाव्यात.

३९) पाठयपुस्तकातील मोठया घटकांचे, छोटया छोटया घटकात रुपांतर करुन शिकवण्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास चांगला टिकावू होतो.

४०) वर्गात पर्यावरण विषयी विविध पोस्टर्स लावली तर विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण कुतूहल जागवता येते.

४१) चित्रे, आकृत्या काढून त्याद्धारे शिकविण्यापेक्षा विद्यार्थ्यांची परीक्षेच्या दृष्टीने तयारी करुन घ्यावी.

४२) बाजारात उत्तम प्रतीचे अभ्यास संच उपलब्ध असल्यामुळे पुन्हा त्याच प्रकारचे संच तयार करण्यात वेळ, श्रम घालविण्यात अर्थ नसतो.

४३) शिकविण्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर निश्चित होणार असला तरी शिकविण्याचे मूल्यमापन केलेच पाहिजे.

४४) विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील उदाहरणे व दाखले देवून शिकविणे योग्य असते.

४५) शिकवताना विद्यार्थ्यांनी सुचवलेल्या मुद्दयांची किंवा सूचनांची दखल घेण्याची गरज नसते.

४६) शिकविताना चित्रे, आकृत्या, प्रतिकृती या सारख्या माध्यमांचा वापर करुन शिकविणे आवश्यक असते.

४७) शिक्षणासंबंधी कोणताही नवा प्रवाह, नवीन योजना (उदा. अंगणवाडी भोजन) आमलात आणावी.

४८) बदलत्या शिक्षण व समाज व्यवस्थेमध्ये शिक्षकाने मित्र, मार्गदर्शक, सामाजिक अभियंता या भूमिका पार पाडण्याची गरज नसते.

४९) विद्यार्थ्यांनी पाठयपुस्तकातील प्रतिकृती शिक्षकांकडून तयार करुन घ्याव्यात.

५०) शैक्षणिक क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती विद्यार्थ्यास असावी.

५१) शाळेमध्ये सामाजिक जीवनावरील विषयाचे परिसंवाद आयोजित करावेत.

५२) चित्रपट दाखविण्याची सोय शाळेत करावी.

५३) विज्ञान विषयक चित्रपट पाहण्यास विद्यार्थ्यांस प्रवृत्त करावे.

५४) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत अडचणी जाणून त्यांना मदत / मार्गदर्शन करावे.

५५) इंटरनेट बद्दलची माहिती विद्यार्थ्यास देण्याची आवश्यकता नसते.

५६) शैक्षणिक विषयातील समस्यांवर चित्रकला प्रदर्शनाचे आयोजन करावे.

५७) विद्यार्थ्यांस जागतिक घडामोडीची माहिती करुन देणे आवश्यक नसते.

५८) शाळेत दूर शिक्षणाचे महत्व सांगण्याची आवश्यकता नसते.

५९) शैक्षणिक साधने उपलब्ध नसल्यास पर्यायी साधने वापरावीत.

६०) शैक्षणिक साहित्याचा योग्य वापर होतो की नाही याचे निरीक्षण करावे.

६१) शैक्षणिक साहित्य घेताना ते अद्ययावत असावे असा अट्हास नसावा.

६२) शैक्षणिक साहित्य जमवण्याची आवश्यकता नसते.

६३) प्रसिध्द व्यक्तींच्या कार्याबद्दलची सर्वांना माहिती होण्यासाठी वर्णन पुरेसे ठरते.

६४) शिकविताना व्हीडिओ वर शैक्षणिक चित्रफिती दाखवाव्यात.

६५) आवश्यक ठिकाणी योग्य छापील साहित्याचा वापर करावा.

६६) ग्रंथालयात पुस्तके उपलब्ध असतात म्हणून पुस्तकांचा संग्रह करण्याची आवश्यकता नसते.

६७) विज्ञान विषयक पुस्तकांचा संग्रह करावा.

६८) माहिती व तंत्रज्ञान या विषयाची सर्व माहिती असणे गरजेचे नसते.

६९) औद्योगिक क्षेत्रात प्रदूषण जास्त असते म्हणून अशा ठिकाणीचा सहलीसाठी समावेश करु नये.

७०) शिकविताना वास्तवतेचा भास निर्माण करणाऱ्या चित्रांचा वापर करावा.

७१) शालेय प्रयोगाचे दिग्दर्शन विद्यार्थ्यास करण्यास सांगावे.

७२) शाळेतील जुन्या शैक्षणिक साहित्यांची / उपकरणांची मोडतोड टाळण्यासाठी आवश्यकते – नुसार त्यात बदल करु नयेत.

७३) सामुहिक पध्दतीने शिकविताना ध्वनी प्रक्षेपकाचा वापर टाळावा.

७४) शिकविताना भौमितिक आकृती मुक्त – हस्त पध्दतीने काढणे सोईचे असते.

७५) शिकविताना रंगीत खडूचा वापर आवश्यक असतोच असे नाही.

७६) पर्यावरण संरक्षण व संवर्धन या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करावे.

७७) सौर उर्जा, बायोगॅस या अपारंपारिक उर्जा वापरणे सोइचे नसल्यामुळे शैक्षणिक साहित्यात त्याचा समावेश नसावा.

७८) विद्यार्थ्यांना वृक्षारोपनाचे महत्व समजावून सांगण्याची गरज नसते.

७९) विविध विषयातील शैक्षणिक पाठयांशावर / भागावर तज्ञ लोकांची व्याख्याने आयोजित करावीत.

८०) विद्यार्थ्यांकडून आपल्या भौगोलिक परिसराचा (उदा. शहर, गांव) नकाशा भरुन घेण्यात वेळ वाया घालवू नये.

८१) विद्यार्थ्यांना शास्त्रीय उपकरणे हाताळण्यास देवू नयेत.

८२) विद्यार्थी सहभाग घेवून कार्यशाळेचे आयोजन करावे.

८३) पाठयांश शिकवून संपल्यानंतर त्यावरील स्वाध्याय वर्गातच सोडवावा.

८४) शैक्षणिक चित्रपट दाखवल्यामुळे विद्यार्थ्यांना त्या विषयाचे ज्ञान चांगले मिळते.

८५) वर्तमान पत्रातून प्रसिध्द होणारी निरनिराळी माहिती विद्यार्थ्यांना करुन दयावी.

८६) शाळेतील पर्यवेक्षकांनी वर्गामध्ये चालणाऱ्या तासांचे परीक्षण करण्याची गरज नसते.

८७) विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचा संग्रह करण्यास प्रवृत्त करावे.

८८) नवीन उपक्रमांच्या कार्यवाहीचे मूल्यमापन करणे आवश्यक नसते.

८९) शाळेतील बागेची देखभाल माळयानेच करावी.

९०) कार्यानुभव या विषयासाठी शाळेच्या वेळापत्रकात सोय करण्याची गरज नसते.

९१) शाळेतील जुन्या वेळापत्रकाला अनुसरुनच नवीन वेळापत्रक बनवावे.

९२) विद्यार्थ्यांना कार्यानुभव विषयामध्ये भविष्यात उपयोगी पडणारे तंत्रज्ञानाचे विषय शिकवावेत.

९३) शैक्षणिक साधन सामुग्रीच्या श्रोताची माहिती करुन घ्यावी.

९४) ग्राम स्वच्छता अभियानाबद्दल सर्वामध्ये जनजागृती निर्माण करावी.

९५) शाळेत विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण देण्यासाठी वेळापत्रकात त्याची नोंद असावी.

९६) शाळेत संस्कार शिबिराचे आयोजन करावे.

९७) दूरदर्शनवरील शालेय कार्यक्रम विद्यार्थ्यांना कितपत समजला याचे मूल्यमापन करण्याची आवश्यकता नसते.

९८) विद्यार्थ्यांनी मैदानी खेळ खेळण्यात आपला वेळ वाया घालवू नये.

९९) विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासाची सवय लागण्यासाठी स्वाध्याय दिला पाहिजे.

१००) विद्यार्थी, शिक्षक नाते आदराचे तसेच खेळीमेळीचे असावे.

# उत्तरपत्रिका

नांव------------------------------------ लिंग मुलगा/मुलगी

महाविद्यालय--------------- ग्रामीण/शहरी

| अक्र | १ | २ | ३ | ४ | ५ | अक्र | १ | २ | ३ | ४ | ५ | अक्र | १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | ३६ | | | | | | ७१ | | | | | |
| २ | | | | | | ३७ | | | | | | ७२ | | | | | |
| ३ | | | | | | ३८ | | | | | | ७३ | | | | | |
| ४ | | | | | | ३९ | | | | | | ७४ | | | | | |
| ५ | | | | | | ४० | | | | | | ७५ | | | | | |
| ६ | | | | | | ४१ | | | | | | ७६ | | | | | |
| ७ | | | | | | ४२ | | | | | | ७७ | | | | | |
| ८ | | | | | | ४३ | | | | | | ७८ | | | | | |
| ९ | | | | | | ४४ | | | | | | ७९ | | | | | |
| १० | | | | | | ४५ | | | | | | ८० | | | | | |
| ११ | | | | | | ४६ | | | | | | ८१ | | | | | |
| १२ | | | | | | ४७ | | | | | | ८२ | | | | | |
| १३ | | | | | | ४८ | | | | | | ८३ | | | | | |
| १४ | | | | | | ४९ | | | | | | ८४ | | | | | |
| १५ | | | | | | ५० | | | | | | ८५ | | | | | |
| १६ | | | | | | ५१ | | | | | | ८६ | | | | | |
| १७ | | | | | | ५२ | | | | | | ८७ | | | | | |
| १८ | | | | | | ५३ | | | | | | ८८ | | | | | |
| १९ | | | | | | ५४ | | | | | | ८९ | | | | | |
| २० | | | | | | ५५ | | | | | | ९० | | | | | |
| २१ | | | | | | ५६ | | | | | | ९१ | | | | | |
| २२ | | | | | | ५७ | | | | | | ९२ | | | | | |
| २३ | | | | | | ५८ | | | | | | ९३ | | | | | |
| २४ | | | | | | ५९ | | | | | | ९४ | | | | | |
| २५ | | | | | | ६० | | | | | | ९५ | | | | | |
| २६ | | | | | | ६१ | | | | | | ९६ | | | | | |
| २७ | | | | | | ६२ | | | | | | ९७ | | | | | |
| २८ | | | | | | ६३ | | | | | | ९८ | | | | | |
| २९ | | | | | | ६४ | | | | | | ९९ | | | | | |
| ३० | | | | | | ६५ | | | | | | १०० | | | | | |
| ३१ | | | | | | ६६ | | | | | | | | | | | |
| ३२ | | | | | | ६७ | | | | | | | | | | | |
| ३३ | | | | | | ६८ | | | | | | | | | | | |
| ३४ | | | | | | ६९ | | | | | | | | | | | |
| ३५ | | | | | | ७० | | | | | | | | | | | |